**“महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट-अप धोरण (Maharashtra State Innovation and Startup Policy-MSInS Policy)” संदर्भात सर्व सहभागधारक/सर्वसामान्य जनता यांचे अभिप्राय/सूचना प्राप्त करणे.**

राज्यात उद्योजकता विकास, नाविन्यता व स्टार्ट-अप या संदर्भातील उपक्रमांना गती देण्यासाठी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने “महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट-अप धोरण (Maharashtra State Innovation and Startup Policy-MSInS Policy)” चा मसूदा तयार केला असून सर्व सहभागधारक/ सर्वसामान्य जनता यांचे अभिप्राय/सूचना प्राप्त करण्याच्या दृष्टीने सदर मसुदा दिनांक ०८/०४/२०१७ ते ०७/०५/२०१७ या कालावधीत **www.maharashtra.gov.in, aaplesarkar.maharashtra.gov.in, www.dvet.gov.in, rojgar.mahaswayam.in, www.maharojgar.gov.in** या संकेतस्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तरी संबंधितांना आवाहन करण्यात येते की, सदर धोरणाच्या मसुद्याचे अवलोकन करुन त्यासंदर्भात अभिप्राय/सूचना मराठी अथवा इंग्रजी भाषेत PDF स्वरुपात ई-मेलद्वारे sded.startup@maharashtra.gov.in वर अथवा लेखी स्वरुपात कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, दालन क्रमांक २०४, दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०००३२ या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदर अभिप्राय/सूचना दिनांक ८ मे, २०१७ रोजीपर्यंत प्राप्त होणे आवश्यक आहे.

प्रधान सचिव,
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

धोरणाचा मसुदा (Draft Policy)

# महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट-अप धोरण-२०१७

## (Maharashtra State Innovation and Start-up Policy-2017)


कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, महाराष्ट्र राज्य.

Skill Development and Entrepreneurship Department,
Maharashtra State

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | १ |
| १ | **महाराष्ट्र राज्य पार्श्वभूमी** | १ |
| २ | **दृष्टीकोन, धोरणाची उद्दिष्ट्ये व लक्ष्यांक** | २ |
| २.१ | दृष्टीकोन (Vision) | २ |
| २.२ | उद्दिष्टे व लक्ष्यांक | २ |
| २.३ | Start-up आस्थापना | २ |
| ३ | **जागतिक बँकेच्या मार्गदर्शक बाबी** | ३ |
| ४ | **नाविन्यता व Start-up धोरणातील ठळक बाबी** | ३ |
| ४.१ | **पायाभूत व अनुषंगिक सुविधांचा विकास** | ३ |
| ४.१.१ | भौतिक पायाभूत सुविधांचा विकास | ३ |
| ४.१.१.१ | PPP तत्वावर Incubators उभारणे | ३ |
| ४.१.१.२ | Start-up Village ची उभारणी | ४ |
| ४.१.१.३ | दोन जागतिक दर्जाच्या Accelerator ची उभारणी करणे | ४ |
| ४.१.१.४ | Incubator मधील सुविधा | ५ |
| ४.१.१.५ | प्रस्थापित नामांकित उद्योगांमार्फत “नाविन्यतापूर्ण संकल्पना आणि संशोधन व विकास - सेंटर ऑफ एक्सलन्स (Center of Eexcellence for Innovation and R & D)” उभारणे | ६ |
| ४.१.१.६ | माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास | ६ |
| ४.१.२ | कार्यक्रम व्यवस्थापन सुविधा (Programme Management) | ६ |
| ४.१.२.१ | Ease of doing Business | ६ |
| ४.१.२.२ | व्यवस्थापन विषयक इतर बाबी | ७ |
| ४.१.२.३ | राज्य स्तरावर व जिल्हा स्तरावर नाविन्यता संस्थांची स्थापना करणे | ७ |
| ४.२ | **मनुष्यबळ व कौशल्य विकास** | ८ |
| ४.२.१ | शैक्षणिक बाबींमध्ये सुधारणा | ८ |
| ४.२.२ | शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना Start-up Boxes चे वितरण | ९ |
| ४.२.३ | उद्योजकता विकास प्रशिक्षण संस्था | ९ |
| ४.२.४ | बुट कॅम्पस् | १० |
| ४.२.५ | शैक्षणिक संस्था स्तरावर उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम | १० |
| ४.२.६ | आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार | १० |
| ४.२.७ | आंतरराष्ट्रीय स्टार्टअप संस्कृती व विनिमय कार्यक्रम (Exchange Program) | १० |
| ४.२.८ | नाविन्यता क्षेत्रे (Innovation Zones) | १० |
| ४.२.९ | आरोग्य तंत्रज्ञान (Health Technology) क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम | १० |
| ४.२.१० | जैव तंत्रज्ञान (Bio Technology) क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम | १० |
| ४.२.११ | बाजार समर्थन (Market Support) आणि राज्य स्तरावरील माहिती संकलन | ११ |
| ४.२.१२ | उद्योगांकरिता जाहिरात व संपर्क कार्यक्रम | ११ |

| अ.क्र | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.२.१३ | डिजिटल मार्केटींग ........................................................................................ | ११ |
| ४.२.१४ | विज्ञान तंत्रज्ञान व संशोधन संस्थांमध्ये Start-up सुरु करण्यासाठी सुविधा निर्माण करणे........ | ११ |
| ४.२.१५ | विज्ञान कार्यशाळा/परिषद व उद्योग-शैक्षणिक संस्था यांचे परस्पर सहकार्य....................... | ११ |
| ४.३ | **निधीची उपलब्धता, आर्थिक/आर्थिकेतर व इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात सुट/प्रोत्साहन**......... | ११ |
| ४.३.१ | Start-up करीता निधीची उपलब्धता....................................................................... | ११ |
| ४.३.२ | आर्थिकेतर बाबींसंदर्भात सूट/प्रोत्साहन................................................................. | १२ |
| ४.३.२.१ | विविध कायद्यांतर्गत स्वप्रमाणित प्रमाणपत्रे.............................................................. | १२ |
| ४.३.२.२ | महिलांना तीन पाळयांमध्ये काम करण्याची परवानगी.................................................. | १२ |
| ४.३.२.३ | नाविन्यता आव्हान अनुदान.................................................................................. | १२ |
| ४.३.३ | आर्थिक प्रोत्साहन............................................................................................ | १२ |
| ४.३.३.१ | अनुदान......................................................................................................... | १२ |
| ४.३.३.२ | इतर आर्थिक सहाय्य/सूट..................................................................................... | १२ |
| ४.३.३.३ | मनुष्यबळ विकास कार्यक्रमाकरीता सहाय्य.............................................................. | १३ |
| ४.३.३.४ | सार्वजनिक उपक्रमांमार्फत (PSUs) सामाजिक दायित्व कार्यक्रम (CSR)............................ | १३ |
| ४.३.३.५ | नोंदणी शुल्काची प्रतिपूर्ती (Stamp Duty Registration Fee)......................................... | १३ |
| ४.३.३.६ | पेटंट नोंदणी शुल्क (Patent Filing Cost)................................................................ | १३ |
| ४.४ | **प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांचा सहभाग व योजनेचे संनियंत्रण**................................... | १३ |
| ४.४.१ | मार्गदर्शक मंडळ.............................................................................................. | १३ |
| ४.४.२ | नाविन्यता कक्ष (Innovation Cell)....................................................................... | १३ |
| ४.४.३ | औद्योगिक आस्थापनांचा सक्रिय सहभाग................................................................. | १४ |
| ४.५ | **ग्रामीण व सामाजिक क्षेत्रातील** Start-up/Incubators................................................ | १४ |
| ४.५.१ | संपर्क यंत्रणा विकसित करणे (Networking)............................................................. | १४ |
| ४.५.२ | निधीची उपलब्धता........................................................................................... | १४ |
| ४.५.३ | इतर सोयी सुविधा............................................................................................ | १४ |

# कौशल्य विकास व उद्योजकता विभाग

## महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट-अप धोरण - २०१७ चा मसुदा

(Draft Maharashtra State Innovation & Start-up Policy -२०१७)

**प्रस्तावना :-**

तंत्रज्ञानातील नाविन्यता ही बाब कोणत्याही देशाच्या व राज्याच्या आर्थिक व सामाजिक उन्नतीचा पाया आहे. जगातील बहुतांश देश सद्य:स्थितीत आर्थिक अरिष्टामधून जात असून पर्यावरण बदलामुळे विविध प्रकारच्या निर्मिती व उपयोगिता पद्धतीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर स्थित्यंतरे होत आहेत. माहिती तंत्रज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी इत्यादी क्षेत्रातील वेगवान बदलामुळे जागतिक स्तरावर देखील मोठ्या प्रमाणात सामाजिक बदल घडत आहेत. या सर्व जागतिक स्तरावरील बदलांचा देशात व राज्यात मोठ्या प्रमाणात परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे देशातील लोकांचे जीवनमान उंचावणे/सुकर करणे तसेच पर्यावरणात होणाऱ्या बदलास अनुसरुन विविध प्रकारचे संशोधन करणे व त्याचा वापर करुन उत्पादन, सेवा, विक्री व विपणन व पर्यावरण इत्यादी क्षेत्रातील घटकांना त्याचा उपयोग व्हावा यासाठी राष्ट्रीय स्तरावर केंद्र शासनाने “नाविन्यता धोरणाची” आखणी केली आहे. सदर धोरणामध्ये नमूद करण्यात आलेले लक्ष्य व इतर अनुषंगिक बाबी ह्या सूचक (Indicative) स्वरुपाच्या असून त्यात परिस्थितीनुरुप बदल अपेक्षित आहे.

राष्ट्रीय स्तरावरील नाविन्यता धोरणात प्रामुख्याने खालील बाबींवर भर देण्यात आला आहे.

१) तंत्रज्ञान व नाविन्यतेशी संबंधित तरुण व उत्पादनक्षम मनुष्यबळास विविध स्तरावर संशोधनाकरिता पोषक वातावरण निर्मिती करणे.

२) संशोधन व विकास क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढविणे.

३) खालील क्षेत्रात विशेष करुन संशोधन व विकास कार्यक्रम राबविणे.

   i. कृषी
   ii. टेलिकम्युनिकेशन
   iii. उर्जा
   iv. पाणी व्यवस्थापन
   v. आरोग्य व औषध निर्माण
   vi. पर्यावरण विकास

४) नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या विकासाकरिता “नाविन्यता Incubator” ना सहाय्य करणे.

५) पारंपारिक ज्ञान व आधुनिक तंत्रज्ञान याची सांगड घालून राष्ट्रीय समस्यांचे समाधान शोधणे.

६) नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर प्रत्यक्ष उद्योगांमध्ये करुन त्याआधारे मोठ्या प्रमाणावर/व्यापक स्वरुपात त्याचा उपयोग करणे.

७) नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारीत उद्योग उभारणी करणाऱ्या युवक युवतींना शिक्षण, प्रशिक्षण व मार्गदर्शन इत्यादी यंत्रणा उभारण्याकरिता गुंतवणूक करणे.

राज्याची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, नैसर्गिक साधनसंपत्ती व पर्यावरण विषयक मुद्दे तसेच राज्यातील नवउद्योगाच्या वाढीस आवश्यक असलेले पोषक वातावरण विचारात घेऊन व राष्ट्रीय स्तरावरील धोरणातील विविध बाबीस अनुलक्षून राज्य स्तरावर **“महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट-अप धोरण-२०१७”** तयार करण्यात आले आहे.

**१. महाराष्ट्र राज्य पार्श्वभूमी :-**

महाराष्ट्र हे लोकसंख्येच्या तुलनेत ११.२४ कोटी लोकसंख्येसह देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून “मुंबई” ही राज्याची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी आहे. देशाच्या सकल उत्पादनामध्ये राज्याचा वाटा १३.२८% इतका तर लोकसंख्येत ९.३% इतका आहे. सबब महाराष्ट्र हे औद्योगिक व शैक्षणिकदृष्ट्या पुढारलेले राज्य असून राज्यातील सकल उत्पादनात औद्योगिक क्षेत्राचा वाटा ८८.७% असून कृषी क्षेत्राचा वाटा ११.३% आहे. महाराष्ट्र हे मोठ्या प्रमाणात

औद्योगिकरण झालेल्या राज्यापैकी एक असून लघु व मध्यम उद्योगक्षेत्रातील उद्योगांना आकर्षित करणारे राज्य आहे. राज्याने मनुष्यबळ विकास क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे. राज्यात लघु व मध्यम उद्योगक्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत असून विविध क्षेत्रात रोजगार निर्मिती होत आहे. राज्यात औद्योगिक क्षेत्राला व अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी SEZ (Special Economic Zones) तयार करण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत राज्यात विविध क्षेत्रात प्रशिक्षण/शिक्षण देण्यासाठी विद्यापीठे, शैक्षणिक/व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्था असून त्यात दर्जेदार शिक्षण/प्रशिक्षणाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे मनुष्यबळ तयार करण्यात येते.

सदर बाबींचा विचार करता महाराष्ट्रात एकूणच पायाभूत सुविधांचा विकास, स्वदेशी (Domstic) व विदेशी गुंतवणूक (Foreign Investment), विकसित औद्योगिक क्षेत्र, कुशल मनुष्यबळ इत्यादी बाबी मुबलक प्रमाणात असून या माध्यमातून "तंत्रज्ञान व नाविन्यता" क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या नाविन्यता धोरणाच्या धर्तीवर राज्यात **"महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट - अप धोरण-२०१७"** तयार करण्यात आले आहे.

## २. दृष्टीकोन, धोरणाची उद्दिष्ट्ये व लक्ष्यांक :

### २.१ दृष्टीकोन (Vision) -

- राज्यामध्ये नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या माध्यमातून Start-up संस्कृती विकसित करणे.
- नवनवीन संकल्पनांना प्रत्यक्ष विविध उत्पादन प्रक्रियेत रुपांतरीत करणे.
- नवउद्योजकांना मार्गदर्शन करणे.
- नवनवीन संकल्पनांवर आधारीत Start-up उद्योगांना Incubator च्या माध्यमातून उद्योग उभारणी, उत्पादन, निर्मितीकरिता सहाय्य करणे. जेणे करुन सदर उद्योग भविष्यात मोठ्या प्रमाणात विकसित होऊन राष्ट्रीय/राज्याच्या उत्पादनात भर घालू शकतील.
- नवसंकल्पनांच्या आधारे राज्यातील विविध समस्यांचे किफायतशीर मार्गाने समाधान शोधणे.
- Start-up च्या माध्यमातून राज्यात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करणे.

### २.२ उद्दिष्टे व लक्ष्यांक

महाराष्ट्र राज्य नाविन्यता व Start-up धोरणाच्या माध्यमातून पुढील **पाच वर्षांकरिता (२०१७-२०२२)** खालील उद्दिष्टे निश्तिच करण्यात आली आहेत.

i. राज्यात Start-up व Incubation चा विकास करण्यासाठी रुपये ५००० कोटी इतकी गुंतवणूक आकर्षित करणे.

ii. रुपये २५०० कोटी इतका निधी नवउद्योजकांच्या विविध उपक्रमांकरिता उपलब्ध करणे. (राज्याच्या एकूण अर्थसंकल्पीत रक्कमेच्या १% या प्रमाणात)

iii. राज्यात अधिक मागणी असलेल्या १२ क्षेत्रांमध्ये सरासरी प्रत्येकी ३ याप्रमाणे Incubators ची स्थापना करणे. तथापि, प्रत्येक जिल्ह्यात किमान १ Incubator राहील.

iv. पुढील पाच वर्षात राज्यात २००० Start-up सुरु करुन त्यांचा विकास करणे.

v. राज्यात विशेष करुन Start-up करिता Venture Capital च्या माध्यमातून किमान रुपये २००० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सहाय्य करणे.

vi. राज्यात पुढील पाच वर्षात किमान १० लक्ष चौ.फूट एवढ्या जागेचा Incubation करिता विकास करणे.

### २.३ Start-up आस्थापना

i. नोंदणी झाल्यापासून पाच वर्षे कालावधीची आस्थापना Start-up म्हणून गणली जाईल.

ii. आस्थापनेची वार्षिक आर्थिक उलाढाल रुपये २५ कोटी च्या मर्यादेत असावी.

iii. सदर आस्थापना नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित, उत्पादन/सेवा, नवीन उत्पादन/प्रकीयेचे नाविन्यपूर्ण पद्धतीने व्यापारीकरण इत्यादी क्षेत्राशी संबंधित असावी.

## ३. जागतिक बँकेच्या मार्गदर्शक बाबी

जागतिक बँकेच्या विकसनशिल देशांसंदर्भातील नाविन्यता धोरणाबाबतच्या (Innovation Policy) मार्गदर्शक सूचनांमध्ये प्रामुख्याने खालील चार बाबींचा समावेश आहे. ज्याप्रमाणे कोणतेही रोपटे लावणे ते जगविणे व त्याचा वृक्ष करणे या नैसर्गिक क्रियेकरिता प्रथम जमीन तयार करणे, त्या जमीनीस सकस बनविणे, आजूबाजूचे अनावश्यक तण काढून टाकणे व लावलेल्या रोपट्यास योग्य प्रमाणात पाणी घालणे या बाबी सदर रोपट्याच्या जगण्यासाठी व निकोप वाढीसाठी आवश्यक असतात. त्याचप्रमाणे कोणत्याही नाविन्यपूर्ण संकल्पनेचा विकास करुन त्याचे सूक्ष्म, लघु व मोठ्या उद्योगात रुपांतरीत करणे यासाठी खालील चार ठळक बाबी आवश्यक ठरतात.

i. आर्थिक सहाय्य (Watering)
ii. नियमात शिथिलता/सूट (Removing Weeds)
iii. संशोधन व माहिती विकास (Nurturing Soil)
iv. शिक्षण (Preparing Ground)

## ४. नाविन्यता व Start-up धोरणातील ठळक बाबी

i. पायाभूत व अनुषंगिक सुविधांचा विकास
ii. मनुष्यबळ व कौशल्य विकास
iii. निधीची उपलब्धता, आर्थिक/आर्थिकेतर व इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात सुट/प्रोत्साहन
iv. प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांचा सहभाग व योजनेचे सनियंत्रण
v. ग्रामिण व सामाजिक उद्योगातील आस्थापना/संस्था

### ४.१ पायाभूत व अनुषंगिक सुविधांचा विकास

#### ४.१.१ भौतिक पायाभूत सुविधांचा विकास

##### ४.१.१.१ PPP तत्वावर Incubators उभारणे.

i. राज्यातील अधिक मागणीच्या खालील **१२ क्षेत्रात** प्रत्येकी ३ याप्रमाणे PPP तत्वावर Incubators उभारण्यात येतील.

१) बांधकाम (Construction)
२) उत्पादन व निर्माण (Production & Manufacturing)
३) वस्त्रोद्योग (Textile)
४) ऑटोमोटिव्ह (Automotive)
५) आतिथ्य (Hospitality)
६) आरोग्य व देखभाल
७) वित्त सेवा व विमा
८) संघटित किरकोळ विक्री
९) औषध उत्पादन व रसायने
१०) माहिती तंत्रज्ञान व संलग्न
११) कृषी प्रक्रिया
१२) जैव तंत्रज्ञान (Bio-Technology)

वरील अधिक मागणीच्या क्षेत्रांपैकी उत्पादन व निर्माण, वस्त्रोद्योग, ऑटोमोटिव्ह, औषध उत्पादन व रसायने, माहिती तंत्रज्ञान व संलग्न, कृषी प्रक्रिया व जैव तंत्रज्ञान या क्षेत्रात Incubators निर्मितीकरिता प्राधान्य देण्यात येईल.

ii. प्रत्येक जिल्ह्यात किमान १ याप्रमाणे PPP तत्वावर Incubators ची स्थापना करण्यात येईल. त्याकरिता संबंधित क्षेत्रातील अग्रगण्य औद्योगिक आस्थापनांचा उभारणीकरिता सहभाग घेण्यात येईल.

iii. एकूण Incubators पैकी किमान १०% Incubators औद्योगिक आस्थापना, शैक्षणिक संस्था व राज्य शासन यांच्या सहकार्याने PPP तत्वावर राज्यातील नामांकित शैक्षणिक संस्था/विद्यापीठे यांच्या आवारात उभारण्यात येतील.

iv. एका Incubator ची Start-up संस्था सामावून घेण्याची किमान क्षमता १० राहील.

v. एका Incubator चे प्रत्यक्ष कामकाजाचे क्षेत्रफळ किमान १०,००० चौ.फूट राहील.

vi. प्रथम टप्प्यात १ लाख चौ.फूट क्षेत्रफळाचा Incubator साठी विकास करण्यात येईल. त्यात १० Incubators व २०० Start-ups चा समावेश राहील.

४.१.१.२ Start-up Village ची उभारणी

i. प्रत्येक प्रशासकीय विभागात एक या प्रमाणे राज्यात एकूण सहा Start-up Villages विकसित करण्यात येतील.

ii. एक Start-up Village करिता किमान २५००० चौ.मी. जागेची आवश्यकता राहील.

iii. सदर Start-up Village ज्या क्षेत्रासाठी उभारण्यात आले आहेत त्या क्षेत्रातील किमान ७०% Start-up आस्थापनांना Ready to Move/Plug & Play स्वरुपात जागा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

iv. Start-up Village मध्ये सामायिक सुविधा केंद्र, सभागृह, Meeting Room, इंटरनेट/Wi-Fi जोडणी, Video Conferencing, ग्रंथालय इत्यादी सुविधा उपलब्ध राहतील.

**४.१.१.३ दोन जागतिक दर्जाच्या Accelerator ची उभारणी करणे**

i. Start-up मध्ये संकल्पना मूर्त स्वरुपात आल्यानंतर त्यावर आधारीत उद्योगाची व्याप्ती वाढविणेच्या दृष्टीने अनुषंगिक बाबींकरिता सहाय्य करणे याकरिता Accelerator ची स्थापना करण्यात येईल.

ii. नागपूर व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक याप्रमाणे राज्यात दोन जागतिक दर्जाच्या Accelerator ची उभारणी करण्यात येईल.

iii. राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवी आस्थापनांसमवेत सामंजस्य करार करुन PPP तत्वावर राज्यात जागतिक दर्जाचे Accelerator कार्यान्वित करण्यात येतील.

४.१.१.४ Incubator मधील सुविधा

i. **पायाभूत सुविधा**

- संबंधित क्षेत्रातील उद्योगांना आवश्यक यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीने सुसज्ज असलेले जागतिक दर्जाचे "सामायिक सुविधा केंद्र".
- Audio Visual Conferencing ची सुविधा असलेले Meeting Halls
- सर्व सुविधांनी सुसज्ज Conference Halls/सभागृह

- उद्योगांना पूरक ठरणारे संबंधित यंत्रसामुग्री व साधनसामुग्रीने सुसज्ज संशोधन व विकास केंद्र (R & D Centres)
- ग्रंथालय
- Refreshment Area, जिम
- आवश्यकतेनुसार वसतिगृह, Individual Residents etc.

ii. **अनुषंगिक सहाय्य, उच्च दर्जाचे व्यवस्थापन व प्रशासकीय स्तरावरील अनुभवी तज्ञ मनुष्यबळ**

Accelerators मार्फत Start-up आस्थापनांना उच्च दर्जाचे शासकीय व व्यवस्थापन क्षेत्रातील सेवा देणारे अनुभवी तज्ञ मनुष्यबळ गरजेनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. जेणेकरुन, नवीन Start-up आस्थापनांकडून होणाऱ्या संभाव्य चुका टाळण्यात येवून त्यांना अधिक कार्यक्षमपणे काम करता येईल. तसेच Start-up चे अयशस्वी होण्याचे प्रमाण कमी होईल. यात खालील बाबींचा समावेश राहील.

- व्यवसाय विकास/वृद्धी (Business Development), कार्य व्यवस्थापन (Operation Management), वित्तिय पर्यवेक्षण (Financial Oversight) तसेच Start-up च्या वतीने क्लिष्ट व्यवहार करणे इत्यादी बाबींकरिता Start-up मध्ये अनुभवी मनुष्यबळ नसल्याने/पुरेसा अनुभव नसल्याने याकरिता कुशल व अनुभवी मनुष्यबळाच्या सेवा गरजेनुसार उपलब्ध करुन देणे.
- Start-up मधील उत्पादन विकास (Product Development)/ तंत्रज्ञान विकास (Technology Development) करण्याच्या दृष्टीने संबधीत विषयतज्ञ जसे शास्त्रज्ञ/तंत्रज्ञ यांच्या सेवा Start-up च्या भागीदार (Partner) संस्थांकडून उपलब्ध करुन देण्यात येतील.
- नवीन Start-up करिता विशिष्ट प्रकारच्या यंत्रसामुग्री/ साधनसामुग्री/मनुष्यबळाची निवड/खरेदी करणे, विविध प्रकारच्या अत्यावश्यक सेवा दर्जेदार व किफ़ायतशिरपणे उपलब्ध करुन देणे इत्यादी बाबी Start-up करिता अपुरे मनुष्यबळ व संबंधित क्षेत्रातील कमी अनुभव या कारणाने अवघड ठरतात. सबब, Incubator मार्फ़त Ready to Move स्वरुपात सदर सर्व सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.
- व्यवसायाशी संबंधीत इतर सहभागधारक (Stakeholders) यांच्या समवेत समन्वय घडवून आणण्याकरीता संपर्क व्यवस्था (Networking) स्थापन करण्यासाठी मदत करण्यात येईल.
- Start-up मधील उत्पादन/सेवेकरिता आवश्यक सर्वेक्षण (Survey) करणे तसेच तयार उत्पादनास बाजारपेठ मिळवून देणे (Marketing) याकरीता सहाय्य करण्यात येईल.
- नव उद्योजक/विद्यार्थी यांनी तयार केलेल्या नव नवीन संकल्पनांचे उद्योगात रुपांतर करुन त्याची व्याप्ती वाढविणेबाबतची व्यवहार्यता तपासणे, कायदेशीर व लेखा विषयक बाबींकरिता सहाय्य तसेच

अनुषंगिक मार्गदर्शन इत्यादी Incubators मार्फत करण्यात येईल. जेणेकरुन Start-up चे यशस्वी होण्याचे प्रमाण वाढू शकेल.

**४.१.१.५ प्रस्थापित नामांकित उद्योगांमार्फत "नाविन्यतापूर्ण संकल्पना आणि संशोधन व विकास - सेंटर ऑफ एक्सलन्स (Center of Eexcellence for Innovation and R & D)" उभारणे.**

i. विविध क्षेत्रातील उद्योगांमार्फत PPP तत्वावर क्षेत्रनिहाय "नाविन्यतापूर्ण संकल्पना आणि संशोधन व विकास-सेंटर ऑफ एक्सलन्स (Center of Eexcellence for Innovation and R & D)" स्थापित करण्यात येईल.

ii. प्रत्येक प्रशासकीय विभागात किमान एक याप्रमाणे किमान ०६ सेंटर ऑफ एक्सलन्सची PPP तत्वावर उभारणी करण्यात येईल.

iii. सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये नाविन्यता व संशोधन आणि विकास यासारख्या बाबींकरिता अद्ययावत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

iv. सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये संबंधित औद्योगिक आस्थापनेसह इतर उमेदवारांना संशोधनाकरिता सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील.

v. सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये संशोधनाकरिता संबंधित औद्योगिक आस्थापनेतील तज्ञांसह इतर तज्ञांकडून मार्गदर्शन घेता येईल.

**४.१.१.६ माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास**

i. मोठया औद्योगिक आस्थापनांच्या मदतीने "Device Testing Lab" ची उभारणी करण्यात येईल.

ii. Start-up करिता लागणारे सॉफ्टवेअर घाऊक दरात (Bulk rate) खरेदी करुन उपलब्ध करण्यात येईल.

iii. किमान २ Mbps चे इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन देण्यात येईल.

iv. Start-up करिता Cloud Space व डेटा सेंटरची सुविधा पुरविण्यात येईल.

**४.१.२ कार्यक्रम व्यवस्थापन सुविधा (Programme Management)**

४.१.२.१ Ease of doing Business - राज्यात कोणत्याही प्रकारचा Start-up अथवा उद्योग सुरु करण्याची प्रक्रिया सोपी व जलद गतीने होण्यासाठी खालील प्रकारची उपाययोजना करण्यात येईल.

i. Start-up/उद्योग सुरु करण्यासाठी लागणाऱ्या विविध परवानग्या/परवाने जलद गतीने मिळवून देण्याच्या दृष्टीने एक खिडकी योजना लागू करुन सदर कालावधी कमाल बारा दिवस मर्यादेपर्यंत आणण्यात येईल.

ii. बांधकाम, विद्युत जोडणी, मालमत्ता नोंदणी (Property Registration) इत्यादी बाबी सुलभ व गतीशील करण्यात येतील.

iii. आंतरराज्य माल वाहतूक व कामगार नियमात सुधारणा करण्यात येईल.

**४.१.२.२ व्यवस्थापन विषयक इतर बाबी**

i. **राज्य स्तरावर Start-up Cell ची स्थापना** - Start-up सह IP Protection शी संबंधित Start-up आस्थापनांना राज्य व केंद्र शासनाच्या विविध सवलती प्राप्त करुन देणे, व्यवसाय वृध्दी व उत्पादन विकास यासंदर्भात

पूर्णवेळ काम करणे इत्यादी बाबी सदर Start-up Cell मार्फत हाताळण्यात येतील.

ii. Start-up Cell च्या विविध शाखा जिल्हा स्तरावर तसेच Start-up Village असलेल्या ठिकाणी सुरु करण्यात येतील.

iii. राज्य स्तरावर Start-up Portal व हॉटलाईन सुविधा निर्माण करुन त्याची सांगड राष्ट्रीय Start-up Portal बरोबर घालण्यात येईल.

iv. कोणत्याही Start-up किंवा नवउद्योगातील उत्पादनांचे प्रक्षेपण (Launching) व सदर उत्पादनाचे विश्लेषण करुन त्यात सुधारणा करणे इत्यादीकरिता सहाय्य करण्यात येईल.

v. Start-up आस्थापनांना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी उद्युक्त करणे.

**४.१.२.३ राज्य स्तरावर व जिल्हा स्तरावर नाविन्यता संस्थांची स्थापना करणे.**

i. राज्यातील नाविन्यता संदर्भातील विविध कार्यक्रमांना गती देऊन त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य स्तरावर “महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था (Maharashtra State Innovation Society-MSInS)” स्थापन करण्यात आली आहे.

ii. सदर संस्था सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणीकृत करण्यात येईल.

iii. या संस्थेंतर्गत सर्वसाधारण मंडळ (General Body) व नियामक परिषद (Governing Council) गठीत करण्यात येईल. त्यात संबंधित विभागाचे अधिकारी, शास्त्रज्ञ, शिक्षण तज्ञ, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी, उद्योजक इत्यादींचा अंतर्भाव करण्यात येईल.

iv. नियामक परिषद ही संस्थेच्या दैनंदिन कामकाजाकरिता जबाबदार राहील.

v. महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेंतर्गत क्षेत्रनिहाय नाविन्यता विषयक कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता समिती गठीत करण्यात येईल व त्यामध्ये संबंधित क्षेत्रातील तज्ञ, उद्योजक, औद्योगिक आस्थापना, शिक्षण तज्ञ, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी, Accelerators/Incubators संघटनांचे प्रतिनिधी यांचा समावेश राहील. सदर समित्या संबंधित क्षेत्रातील नाविन्यता विषयक बाबींसाठी सर्वसाधारण मंडळ व नियामक परिषद यांना धोरणात्मक व दैनंदिन कामकाजातील निर्णय घेण्यासाठी सहाय्य व मार्गदर्शन करतील.

vi. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नाविन्यता परिषदेची स्थापना करण्यात येईल.

vii. जिल्हा स्तरावरील नाविन्यता परिषदेमध्ये स्थानिक शिक्षण संस्थाचे प्रतिनिधी, उद्योजक व संबंधित शासकीय विभागाचे अधिकारी, शास्त्रज्ञ यांना प्रतिनिधीत्व देण्यात येईल.

viii. राज्यातील विविध नाविन्यता विषयक कार्यक्रमाची अंमलबजावणी/ सनियंत्रण राज्य स्तरावरील व जिल्हा स्तरावरील सदर यंत्रणेमार्फत

करण्यात येईल. जिल्हा स्तरावरील यंत्रणेंतर्गत क्षेत्रनिहाय उप-समिती स्थापन करण्याची मुभा राहील.

ix. जिल्हा व राज्य स्तरावर सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी आवश्यकतेनुसार अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी तत्वावर अथवा प्रतिनियुक्तीने करण्यात येईल.

**४.२ मनुष्यबळ व कौशल्य विकास**

नाविन्यतापूर्ण संकल्पनांवर आधारीत प्रकल्पांना चालना देण्यासाठी आवश्यक असलेल्या पोषक वातावरणाची निर्मिती शालेय व महाविद्यालयीन स्तरावर करणे गरजेचे आहे. या वयात मुलांची सृजनशिलता उच्चतम पातळीवर असल्यामुळे त्यांना नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या निर्मितीच्या दृष्टीने सहाय्यक ठरतील अशा सोयी सुविधा व प्रोत्साहन दिल्यास या कार्यक्रमास गती प्राप्त होऊ शकेल. त्याकरिता शैक्षणिक क्षेत्राशी संबंधित खालील सुधारणा/बदल यांचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

**४.२.१ शैक्षणिक बाबींमध्ये सुधारणा**

i. **शालेय स्तरावरील अभ्यासक्रम अद्ययावत करणे** - शालेय स्तरावरील अभ्यासक्रमामध्ये "उद्योजकता विकास" या वैकल्पिक विषयाचा समावेश करण्यात येईल. जेणेकरुन, उद्योजक बनण्याची आकांक्षा, क्षमता व कल असलेल्या विद्यार्थ्यांच्या सृजनशिलतेचा शालेय स्तरापासून विकास होण्यास मदत होईल.

ii. **विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रम अद्ययावत करणे** - विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या आधारे उद्योजक होण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांसाठी महाविद्यालयीन स्तरावर "उद्योजकता विकास" या वैकल्पिक विषयाचा समावेश करण्यात येईल.

iii. **प्रशिक्षक/शिक्षक प्रशिक्षण** - शालेय/महाविद्यालयीन स्तरावरील विशेष करुन शास्त्र/ विज्ञान तंत्रज्ञान व व्यावसायिक अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकीय कर्मचाऱ्यांना नाविन्यता व उद्योजकता विषयक बाबी संदर्भातील अद्ययावत प्रशिक्षण देण्यात येईल. जेणेकरुन, शिक्षकांच्या माध्यमातून त्याचा उपयोग विद्यार्थ्यांना होईल.

iv. **सक्तीचे शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण** - कला, विज्ञान व वाणिज्य क्षेत्रातील अभ्यासक्रमांसह इतर सर्व प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता महाविद्यालयीन स्तरावर शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण सक्तीचे करण्यात येईल. त्याकरिता राज्यासाठी स्वतंत्रपणे शिकाऊ उमेदवारी कायदा तयार करण्यात येत असून, सदर कायदा अस्तित्वात आल्यानंतर त्याची काटेकोर व प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल. जेणेकरुन प्रत्यक्ष कामातून मिळणाऱ्या अनुभवातून उमेदवारांची कौशल्य वृध्दी होऊन त्याचा फायदा नाविन्यपूर्ण व सृजनात्मक निर्मितीकरिता होऊ शकेल.

v. **नवनवीन ऑनलाईन अभ्यासक्रमांचा वैकल्पिक विषयात समावेश** - नाविन्यपूर्ण संकल्पनांचा विकास करण्यास उपयुक्त/उद्योजकता विकासास पूरक ठरणाऱ्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध मान्यताप्राप्त ऑनलाईन अभ्यासक्रमांचा समावेश वैकल्पिक विषयात करुन त्यास त्यानुसार श्रेणी देण्याची सुविधा निर्माण करण्यात येईल.

vi. **नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारीत प्रकल्पांचा समावेश महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचा प्रकल्प म्हणून करणे** - महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सादर करावयाच्या विविध प्रकल्पांमध्ये नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारीत प्रकल्पांचा समावेश करण्यात येईल. यामध्ये पुनरावृत्ती

टाळण्यासाठी Start-up व Incubators करिता तयार करण्यात आलेल्या पोर्टलवर संबंधितांना याबाबतची माहिती प्राप्त करता येईल.

vii. **उद्योजक बनण्याची क्षमता व इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांकरिता अवकाश वर्ष (Gap Year) संकल्पना लागू करणे** - उद्योजक बनण्याची क्षमता व इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना उद्योगाकरिता आवश्यक संकल्पना विकसीत करणे/उद्योग सुरु करणे इत्यादी बाबी संस्थेबाहेर राहून करण्यासाठी दुसऱ्या वर्षात किमान एक वर्ष व कमाल दोन वर्षापर्यंत अवकाश (Gap) घेता येईल.

viii. **महाविद्यालयीन व विद्यापीठातील प्राध्यापकांकरिता उद्योजकता विकास पूरक कार्यक्रम** - प्रायोगिक तत्वावर महाविद्यालयांतील व विद्यापीठातील प्राध्यापकांना विविध प्रकल्पांवर Start-up/Incubators मध्ये विद्यार्थ्यांसमवेत ठराविक कालावधीकरिता काम करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल. जेणेकरुन, एखाद्या महत्वपूर्ण नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारीत प्रकल्पांवर विद्यार्थ्यांच्या बरोबरच प्राध्यापकांच्या ज्ञान, अनुभव व कौशल्याचा उपयोग प्रकल्प पूर्ण होण्याकरिता करता येईल.

ix. **तंत्रज्ञानाधारीत उद्योजकांकरिता शालेय/महाविद्यालयीन स्तरावर वाढीव गुणांची सुविधा** - Start-up Team चा भाग असलेल्या विद्यार्थ्यांना शालेय/महाविद्यालयीन स्तरावर प्रत्येक सत्रातील उपस्थितीमध्ये २०% च्या मर्यादेत सूट देण्यात येईल. तसेच त्यांना एकूण गुणांमध्ये ५% वाढीव गुण देण्यात येतील. जे विद्यार्थी प्रथम वर्षापासून एखाद्या Start-up संकल्पनेवर आधारीत प्रकल्पावर काम करीत असतील अशा विद्यार्थ्यांना त्यांचा अंतिम वर्षाचा प्रकल्प म्हणून सदर प्रकल्पाची निवड करता येईल. त्याचप्रमाणे Incubators व Start-up साठी कार्यरत असलेल्या Mentors/मार्गदर्शकांना त्यांच्या तोंडी परिक्षेकरीता पाचारण करता येईल.

४.२.२ **शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना Start-up Boxes चे वितरण** - शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण संकल्पनांवर काम करण्याची स्वयंस्फूर्ती/प्रोत्साहन मिळण्यासाठी इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार (Aptitude) त्यांनी निवड केलेल्या क्षेत्राशी संबंधित Start-up Boxes चे वाटप करण्यात येऊन त्यांना अशा प्रकारच्या प्रकल्पावर काम करण्यास प्रोत्साहित करण्यात येईल. त्याकरिता लागणारा निधी CSR च्या माध्यमातून उभारता येईल.

४.२.३ **उद्योजकता विकास प्रशिक्षण संस्था** - तंत्रज्ञानाधारीत नाविन्यपूर्ण संकल्पनांचा विकास करुन त्यावर आधारीत उद्योग सुरु करण्यासाठी सहाय्य, मार्गदर्शन व आवश्यकतेनुसार प्रशिक्षण इत्यादीकरिता राज्यात उद्योजकता विकास संस्थांची स्थापना करण्यात येईल. संस्थांची निवड विहित अटी, शर्ती व निकषांच्या आधारे विहित पध्दतीने करुन त्यांना नोंदणीकृत करण्यात येईल. सदर संस्थांकडे क्षमता चाचणीपासून उद्योग सुरु करुन त्याचा पाठपुरावा करण्यापर्यंतचे काम सोपविण्यात येईल. याकरिता शासनाकडून विहित दराने प्रशिक्षण व अनुषंगिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्यात येईल.

४.२.४ **बुट कॅम्पस्** - राज्यात शाळा व महाविद्यालयीन स्तरावर संबंधित विभागात कार्यरत असलेल्या Incubatorsच्या मदतीने नाविन्यता व उद्योजकता विकासाच्या दृष्टीने बुट कॅम्पस् चे आयोजन करण्यात येईल. त्याकरिता कार्यक्रमाचे वार्षिक वेळापत्रक तयार करुन ते संबंधित शाळा व महाविद्यालयांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस कळविण्यात येईल.

४.२.५ **शैक्षणिक संस्था स्तरावर उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम** - Incubators कार्यरत असलेल्या परिसरातील शाळा, महाविद्यालयांमध्ये Incubatorsच्या सहाय्याने एक दिवसीय

नाविन्यता व उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. या संबंधीचे वार्षिक वेळापत्रक तयार करुन संबंधित संस्थांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस कळविण्यात येईल.

४.२.६ **आंतरराष्ट्रीय दर्जाचे सल्लागार** - राज्य शासनामार्फत आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांना Incubatorsमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कार्यक्रमात निमंत्रित करण्यात येईल.

४.२.७ **आंतरराष्ट्रीय स्टार्टअप संस्कृती व विनिमय कार्यक्रम** (Exchange Program) - विविध नवीन संकल्पनांच्या विनिमयाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअप संस्कृती व विनिमय कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. तसेच जागतिक पातळीवर एक्सपोजर मिळण्याच्या दृष्टीने राज्यातील सर्वोत्तम Incubators, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थी यांना अशा प्रकारच्या जागतिक पातळीवरील स्टार्टअप व नाविन्यता कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

४.२.८ **नाविन्यता क्षेत्रे** (Innovation Zones) - विविध संस्था/औद्योगिक आस्थापना यांना संबंधित क्षेत्रातील Start-up ना उपयुक्त ठरणारे, उद्योग आणि शैक्षणिक संस्था यांच्यामधील संवाद वाढविणारी **"नाविन्यता क्षेत्रे"** स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल. या नाविन्यता क्षेत्रांमध्ये संबंधित संस्थेतील/औद्योगिक क्षेत्रातील प्राध्यापक/शिक्षक/कर्मचारी/विद्यार्थी आपल्या सोयीप्रमाणे व आवडीनुसार नाविन्यपूर्ण संकल्पनांवर काम करु शकतील. त्याकरिता आवश्यक पायाभूत व अनुषंगिक सुविधा संबंधित आस्थापना/शैक्षणिक संस्थेमार्फत पुरविण्यात येतील.

४.२.९ **आरोग्य तंत्रज्ञान (Health Technology) क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम** - नाविन्यता व स्टार्ट-अप धोरणाचा फायदा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने सर्वसामान्यांच्या आरोग्य विषयक गरजा पूर्ण करण्यासाठी आरोग्य तंत्रज्ञान विकसित करणे. उदा.E-Health सारखे Mobile App विकसित करणे इत्यादी. याकरिता आरोग्य क्षेत्राशी निगडीत उत्कृष्ट दर्जाचे Incubators विकसित करणे.

४.२.१० **जैव तंत्रज्ञान (Bio Technology) क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम** - जैव तंत्रज्ञान क्षेत्रात नाविन्यतापूर्ण संशोधनाला मोठा वाव आहे. त्याचा फायदा कृषि व अनुषंगिक क्षेत्राशी (Agriculture & Allied Sectors) निगडीत संबंधित शेतकऱ्यांसह इतर सहभागधारक व सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने सदर क्षेत्रातील गरजा पूर्ण करण्यासाठी जैव तंत्रज्ञान क्षेत्रात उत्कृष्ट दर्जाचे Incubators विकसित करणे.

४.२.११ **बाजार समर्थन (Market Support) आणि राज्य स्तरावरील माहिती संकलन (State Database)** - बाजारपेठ व इतर अनुषंगिक सर्वेक्षण, बाजारपेठ कल संशोधन, बाजारपेठ इंटेलिजन्स इत्यादीबाबत शासनामार्फत सहाय्य करण्यात येईल. त्याचप्रमाणे शासनामार्फत वेळोवेळी संकलीत करण्यात येणारी माहिती (Database) संबंधित Start-up व Incubators यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४.२.१२ **उद्योगांकरिता जाहिरात व संपर्क कार्यक्रम** - संपर्क व जाहिरात इत्यादीच्या वाढीकरिता राज्यातील Start-up आस्थापनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमात भाग घेण्यासाठी शासनामार्फत प्रोत्साहित करण्यात येईल.

४.२.१३ **डिजिटल मार्केटींग** - Incubatorsमध्ये तसेच राज्यात इतरत्र कार्यरत असलेल्या Start-up आस्थापनांना डिजिटल मार्केटींगकरीता वित्तीय सहाय्य देण्यात येईल.

४.२.१४ **विज्ञान तंत्रज्ञान व संशोधन संस्थांमध्ये Start-up सुरु करण्यासाठी सुविधा निर्माण करणे -** राज्यातील विज्ञान तंत्रज्ञान व संशोधन क्षेत्रातील संस्था व Incubators यांच्यात संपर्क यंत्रणा विकसीत करण्यात येईल. त्यामुळे या संस्थांमधील शास्त्रज्ञांना स्टार्टअपच्या माध्यमातून त्यांच्या इंटलेक्च्युअल प्रॉपर्टीजचे व्यापारी तत्वावर प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत अथवा उद्योगामध्ये रुपांतरण करण्याची प्रक्रिया करणे सुकर होईल.

४.२.१५ **विज्ञान कार्यशाळा/परिषद व उद्योग-शैक्षणिक संस्था यांचे परस्पर सहकार्य -** प्रत्येक वर्षी दोन दिवसीय विज्ञान तंत्रज्ञान तथा नाविन्यता परिषद शक्यतो उद्योजकता दिनी आयोजित करण्यात येऊन सदर परिषदेस जागतिक स्तरावरील शास्त्रज्ञ, संशोधक यांना आमंत्रित करण्यात येईल. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये राज्यातील नाविन्यतापूर्ण संशोधनाचे सादरीकरण करुन त्यातील उत्कृष्ट प्रकल्पांची निवड करण्यात येईल व त्यांना सन्मानित करण्यात येईल. अशा प्रकारच्या प्रकल्पांना Start-up चे स्वरुप देण्याच्या दृष्टीने आर्थिक व अनुषंगिक सहाय्यक करण्यात येईल.

## ४.३ निधीची उपलब्धता, आर्थिक/आर्थिकेतर व इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात सुट/प्रोत्साहन

i. Start-up करीता निधीची उपलब्धता
ii. आर्थिकेतर बाबींसंदर्भात सूट/प्रोत्साहन
iii. आर्थिक प्रोत्साहन

४.३.१ **Start-up करीता निधीची उपलब्धता -** राज्यातील उद्योजकता विकासास प्रोत्साहनात्मक वातावरण निर्मितीकरीता Start-up आस्थापनांना विविध योजनांकरीता राज्य स्तरावर निधी उभारण्यात येईल. त्यामध्ये खालील बाबींची तरतूद राहील.

i. राज्यातील विविध वित्तीय संस्थांनी Start-up करीता विविध योजनांतर्गत योग्य अटी व शर्तीच्या आधारे वित्त पुरवठा करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात येईल. या अंतर्गत कर्ज घेतलेल्या Start-up करीता त्यांच्या थकीत/वितरीत कर्जाच्या १०% मर्यादेपर्यंतच्या NPA तरतुदीकरीता शासन हमी देईल.

ii. Start-up आस्थापनांमध्ये खाजगी निधी (Private fund) गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहीत करण्यात येईल.

iii. शासनामार्फत SEBI मान्यताप्राप्त Venture Capital Fund मध्ये २५% पर्यंत गुंतवणूक करण्यात येईल.

iv. Venture Capital Fund/Angel Fund चा उपयोग प्राथमिकतेने Start-up आस्थापनांकरिता करण्यात येईल.

v. जे मान्यताप्राप्त Incubators केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत बीज भांडवल योजनेचा लाभ घेतात, त्यांना केंद्र शासना इतकाच राज्य शासनाकडून बीज भांडवलाकरिता निधी देण्यात येईल. अशा प्रकारे मान्यताप्राप्त Incubators मध्ये कार्यरत असलेल्या Start-up करीता २००% निधी उपलब्ध होईल. तसेच इतर Incubators करीता केंद्र शासनाच्या अटी व शर्तीच्या आधारे राज्य शासनामार्फत बीज भांडवल निधी अदा करण्यात येईल.

vi. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत (National Rural Health Mission) राज्याकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीचा उपयोग नाविन्यता व Start-up धोरणाशी निगडीत विविध उपक्रमांकरिता करण्यात येईल.

#### ४.३.२ आर्थिकेतर बाबींसंदर्भात सूट/प्रोत्साहन

**४.३.२.१** Start-up आस्थापनांना खालील कायद्यांतर्गत स्वप्रमाणित प्रमाणपत्रे विहित नमून्यात सादर करता येईल.

१) कारखाना कायदा (Factory act)
२) प्रसुती लाभ कायदा (The Maternity Benefit Act)
३) दुकान व आस्थापना अधिनियम (Shop & Establishment Act)
४) कंत्राटी कामगार कायदा (Contract labour Act)
५) रक्कम व वेतन कायदा (Payment and Wages Act)
६) किमान वेतन कायदा Minimum Wage Act)
७) रोजगार केंद्रे (Employment Exchanges )

**४.३.२.२** Start-up मध्ये महिलांना तीन पाळयांमध्ये काम करण्याची परवानगी राहील.

**४.३.२.३** **नाविन्यता आव्हान अनुदान** - राज्याला व देशाला भेडसावणाऱ्या समस्यांकरीता नाविन्यतापूर्ण, किफायतशिर समाधान शोधून काढण्याच्या आव्हानाला प्रतिसाद प्राप्त करण्याकरीता विशेष स्पर्धात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. सर्वोत्कृष्ट प्रकल्पाकरीता पारितोषिक व इतर अनुषंगिक मदत इत्यादी स्वरुपात सन्मानित करण्यात येईल. त्याकरीता विशेष निधीची तरतुद करण्यात येईल. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे कार्यक्रम जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर घेण्यात येऊन जिल्हा स्तरावर उत्कृष्ट ठरलेल्या प्रकल्पास विभागीय स्तरावरील स्पर्धेत, तर विभागीय स्तरावर सर्वोत्कृष्ट ठरलेल्या प्रकल्पास राज्य स्तरावरील स्पर्धेत सहभागी होता येईल. राज्य स्तरावरील सहभागी प्रकल्पामधून सर्वोत्कृष्ट प्रकल्पाची निवड करुन त्या प्रकल्पास आर्थिक व इतर स्वरुपातील बक्षिस व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात येईल.

#### ४.३.३ आर्थिक प्रोत्साहन

**४.३.३.१** **अनुदान**-केंद्र शासनाच्या विविध योजनांतर्गत मान्यताप्राप्त Incubators ना केंद्र शासनामार्फत जेवढे अनुदान अदा करण्यात येते, तेवढेच अनुदान राज्य शासनाकडून अदा करण्यात येईल.

**४.३.३.२** **इतर आर्थिक सहाय्य/सूट (Other Financial Assistance/ Concession)** - या संदर्भात शासन स्तरावर स्वतंत्रपणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

**४.३.३.३** **मनुष्यबळ विकास कार्यक्रमाकरीता सहाय्य** - मान्यताप्राप्त Incubators ना एखाद्या योजनेकरीता मान्य करण्यात आलेल्या कार्यक्रम निधीच्या १०% निधी कार्यक्रम अंमलबजावणी, संनियंत्रण इत्यादीकरिता अदा करण्यात येईल.

**४.३.३.४** **सार्वजनिक उपक्रमांमार्फत (PSUs) सामाजिक दायित्व कार्यक्रम (CSR)** - नवीन कंपनी कायदा, २०१३ नुसार राज्यातील सार्वजनिक उपक्रमांमार्फत सामाजिक दायित्व कार्यक्रमांतर्गत (CSR) उपलब्ध निधीचा विनियोग Incubators साठी Corpus Fund च्या उभारणीकरिता करण्यात येईल.

४.३.३.५ **नोंदणी शुल्काची प्रतिपूर्ती (Stamp Duty Registration Fee)** - मान्यताप्राप्त Incubators अथवा Start-up करिता जागा/इमारत विकत/भाडयाने घेणे इत्यादीसाठी अदा करावयाच्या नोंदणी शुल्काच्या प्रथम ट्रान्झेक्शनकरीता १००% व द्वितीय ट्रान्झेक्शनकरीता ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती संबंधीत Incubators/ Start-up ना करण्यात येईल.

४.३.३.६ **पेटंट नोंदणी शुल्क (Patent Filing Cost)** - भारतीय पेटंट नोंदणी करण्यासाठी रुपये २.०० लक्ष मर्यादेत व विदेशातील पेटंट नोंदणी करण्यासाठी रुपये १०.०० लक्ष मर्यादेपर्यंतच्या रक्कमेची प्रतिपूर्ती संबंधितांना खालील तीन टप्प्यात करण्यात येईल.

१) During Filing

२) Prosecution

३) Award

४.४ **प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांचा सहभाग व योजनेचे संनियंत्रण** - राज्यातील विविध क्षेत्रातील प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांचा नाविन्यता संदर्भातील विविध योजनांमधील सक्रिय सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने खालील दोन प्रकारच्या संस्था स्थापित करण्यात येतील.

४.४.१ **मार्गदर्शक मंडळ** - राज्य स्तरावर स्थापित करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेतील सर्वसाधारण मंडळ (General Body) हे मार्गदर्शक मंडळ म्हणून काम करेल. राज्यातील विविध प्रस्थापित औद्योगिक आस्थापना, Start-up, Start-up संघटनाचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, शिक्षण तज्ञ इत्यादींचा यात समावेश आहे. या मार्गदर्शक मंडळामार्फत विविध क्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील उद्योगांशी संपर्क साधून इन्क्युबेशनच्या माध्यमातून Start-up व इनोव्हेशन याकरीता उपयुक्त व सहाय्यकारी योजना तयार करणे, तसेच इनोव्हेशनच्या माध्यमातून पुढे येणाऱ्या नवनवीन संकल्पना हेरुन त्यांना सहाय्य करणे इत्यादीबाबत कार्यवाही करण्यात येईल.

४.४.२ **नाविन्यता कक्ष (Innovation Cell)** - कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय येथे "राज्यस्तरीय नाविन्यता कक्ष (State Innovation Cell)" स्थापन करण्यात येईल. सदर कक्ष हा राज्यातील नाविन्यता विषयक विविध उपक्रमांकरीता Single Point Contact म्हणून काम करेल. त्याच धर्तीवर जिल्हा पातळीवर जिल्हास्तरीय नाविन्यता कक्ष (District Innovation Cell) स्थापन करण्यात येईल. नाविन्यता कक्षांतर्गत खालील बाबींसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

i. राज्य स्तरावरील नाविन्यता कक्ष हा देशातील व देशाबाहेरील विविध औद्योगिक आस्थापनांसमवेत भागिदारी व बाजार विनिमय कार्यक्रम (Market Exchange Program) संदर्भात कार्यवाही करेल.

ii. संबंधित क्षेत्रातील अग्रगण्य औद्योगिक आस्थापना, गुंतवणूकदार आणि उद्योजक यांचा समावेश असलेल्या क्षेत्रनिहाय मार्गदर्शक समित्या गठीत करण्यात येतील.

४.४.३ **औद्योगिक आस्थापनांचा सक्रिय सहभाग**

i. मोठया औद्योगिक आस्थापनांच्या सहभागाने नाविन्यता विकास साधण्याच्या दृष्टीने सदर आस्थापनांमध्ये संशोधन विंग व सेंटर ऑफ एक्सलन्स केंद्र स्थापन करुन त्यांना प्रगत संशोधन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.

ii. मोठया औद्योगिक आस्थापनांना संबंधित क्षेत्रातील Incubators/Accelerators स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.

iii. प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांना राज्यातील विविध व्यावसायिक कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्थांशी संलग्नित करण्यात येईल.

४.५ **ग्रामीण व सामाजिक क्षेत्रातील Start-up/Incubators** - ग्रामीण व सामाजिक क्षेत्रातील Start-up/ Incubators साठी खालील प्रकारचे सहाय्य करण्यात येईल.

४.५.१ **संपर्क यंत्रणा विकसित करणे (Networking)**

i. शासनामार्फत ग्रामीण व सामाजिक क्षेत्रातील उद्योगांच्या वाढीकरिता संबंधित क्षेत्रातील Incubators/Accelerators उभारण्यात येतील.

ii. या क्षेत्रातील नवउद्योजकांना इतर क्षेत्रात कार्यरत असलेल्या Incubators/Accelerators च्या संपर्क यंत्रणेचा उपयोग करता येईल.

४.५.२ **निधीची उपलब्धता** - नवउद्योग/Start-up यांचेकरीता शासनामार्फत स्वतंत्र "इम्पॅक्ट फंड (Impact Fund)" उभारण्यात येईल.

४.५.३ **इतर सोयी सुविधा**

i. या क्षेत्रातील Start-up ची World Bank, WHO इत्यादीसारख्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य संस्थासमवेत भागिदारी राहील.

ii. शासनामार्फत सदर क्षेत्रातील Incubators/Accelerators मध्ये जागतिक स्तरावरील इच्छूक विद्यार्थी, युवक, सामाजिक उद्योजक इत्यादी राज्यातील चालू प्रकल्पांवर (Live Project) काम करु शकतील.

iii. नवउद्योगांकरिता उच्च तंत्रज्ञानावर आधारीत कामे बाह्य यंत्रणेद्वारे करण्यासाठीची यंत्रणा शासनामार्फत विकसित करण्यात येईल.

iv. नवउद्योगांना आवश्यक असलेले Apps व तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी शासनामार्फत संबंधितांना प्रोत्साहित करण्यात येईल.

***

# <u>सारांश</u>

- केंद्र शासनाच्या नाविन्यता धोरणाच्या धर्तीवर राज्यात **“महाराष्ट्र राज्य नाविन्यता व स्टार्ट - अप धोरण-२०१७”.** अंमलबजावणीचा कालावधी पाच वर्ष (२०१७-२०२२).
- **दृष्टीकोन** (Vision) -
  - ❖ नाविन्यपूर्ण संकल्पनांच्या माध्यमातून Start-up संस्कृती विकसित करणे, नवसंकल्पनांच्या आधारे राज्यातील विविध समस्यांचे किफायतशीर मार्गाने समाधान शोधणे व त्यांचे प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेत रुपांतरीत करणे.
  - ❖ नवनवीन संकल्पनांवर आधारीत Start-up उद्योगांना Incubator च्या माध्यमातून उद्योग उभारणी, उत्पादन, निर्मितीकरिता सहाय्य करुन रोजगारनिर्मिती करणे.
- **उद्दिष्टे व लक्ष्यांक (पाच वर्षाकरिता - सन २०१७-२०२२)**
  - ❖ Start-up करिता रु.५००० कोटीची गुंतवणूक आकर्षित करणे, नवउद्योजकांच्या विविध उपक्रमांकरिता रु.२५०० कोटी निधीची व Venture Capital च्या माध्यमातून किमान रु.२००० कोटी निधीची उपलब्धता.
  - ❖ अधिक मागणीच्या ११ क्षेत्रांमध्ये सरासरी प्रत्येकी ३ याप्रमाणे (प्रतिजिल्हा-१) Incubators व २००० Start-up चा तसेच किमान १० लक्ष चौ.फूट जागेचा Incubation च्या माध्यमातून विकास.
- **Start-up आस्थापना** - नाविन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित, वार्षिक रु.२५ कोटी आर्थिक उलाढाल असलेली व नोंदणी झाल्यापासून पाच वर्षे कालावधीची आस्थापना.
- **पायाभूत व अनुषंगिक सुविधांचा विकास**
  - ❖ **भौतिक पायाभूत सुविधांचा विकास**
    - ➢ PPP तत्वावर ११ क्षेत्रात प्रत्येकी ३ याप्रमाणे PPP तत्वावर Incubators ची उभारणी. प्रथम टप्प्यात १ लाख चौ.फूट क्षेत्रफळाचा विकास (१० Incubators व २०० Start-ups)
    - ➢ वरीलपैकी किमान १०% Incubators नामांकित शैक्षणिक संस्था/विद्यापीठे यांच्या आवारात.
    - ➢ प्रत्येकी किमान २५००० चौ.मी.याप्रमाणे सहा **Start-up Villages** चा विकास (प्रति प्रशासकीय विभाग- १)
    - ➢ राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनुभवी आस्थापनांच्या सहभागाने PPP तत्वावर नागपूर व औरंगाबाद येथे प्रत्येकी एक **Accelerator** ची उभारणी.
    - ➢ नामांकित उद्योगांच्या सहभागाने PPP तत्वावर प्रत्येक प्रशासकीय विभागात किमान एक याप्रमाणे किमान ०६ नाविन्यतापूर्ण संकल्पना आणि संशोधन व विकास-**सेंटर ऑफ एक्सलन्स**ची उभारणी.
  - ❖ **कार्यक्रम व्यवस्थापन सुविधा** (Programme Management)
    - ➢ **Ease of doing Business** - एक खिडकी योजनेद्वारे Start-up सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक परवानग्या/परवाने प्राप्त करण्याचा कमाल कालावधी कमाल बारा दिवस मर्यादेपर्यंत आणणे व राज्य, जिल्हा स्तरावर तसेच Start-up Village असलेल्या ठिकाणी Start-up Cell ची स्थापना.
    - ➢ राज्य, जिल्हा स्तरावर **नाविन्यता संस्थांची स्थापना** करुन राज्य स्तरावरील संस्थांची सोसायटी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणी.
- **मनुष्यबळ व कौशल्य विकास**
  - ❖ **शैक्षणिक बाबींमध्ये सुधारणा** -
    - ➢ शालेय, विद्यापीठांतर्गत विविध अभ्यासक्रम अद्ययावत करुन “उद्योजकता विकास” व ऑनलाईन अभ्यासक्रमांचा वैकल्पिक विषय म्हणून समावेश करणे.

- उद्योजकता विकास संदर्भात प्रशिक्षक/शिक्षक प्रशिक्षण व देणे व इच्छूकांना विद्यार्थ्यांसमवेत Start-up/Incubators मध्ये काम करण्याची संधी देणे.
- सक्तीचे शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण
- नाविन्यपूर्ण संकल्पनांवर आधारीत प्रकल्पांचा समावेश महाविद्यालयीन अभ्यासक्रमाच्या शेवटच्या वर्षाचा प्रकल्प म्हणून समावेश करणे.
- Start-up वर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता Gap Year संकल्पना तसेच त्यांना वाढीव गुणांची सुविधा उपस्थितीमध्ये सूट देणे.
- उद्योजकता विकास प्रशिक्षण संस्थांची स्थापना.
- शैक्षणिक संस्था स्तरावर उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम व बुट कॅम्पस्.
- आंतरराष्ट्रीय स्टार्टअप संस्कृती व Exchange Programme ला गती देणे.
- शैक्षणिक संस्थांमध्ये नाविन्यता क्षेत्रे (Innovation Zones) निर्माण करणे.

❖ बाजारपेठ व इतर अनुषंगिक सर्वेक्षण, बाजारपेठ कल संशोधन, बाजारपेठ इंटेलिजन्स तसेच जाहिरात, संपर्क कार्यक्रम, डिजिटल मार्केटींगबाबत सहाय्य.

❖ विज्ञान तंत्रज्ञान व संशोधन संस्थांमध्ये Start-up करिता सुविधा निर्माण करणे.

- **निधीची उपलब्धता, आर्थिक/आर्थिकेतर व इतर अनुषंगिक बाबींसंदर्भात सुट/प्रोत्साहन**

❖ **स्टार्टअप करीता निधीची उपलब्धता –**

- कर्ज घेतलेल्या स्टार्टअपकरीता थकीत/वितरीत कर्जाच्या १०% मर्यादेपर्यंतच्या एनपीए तरतुदीकरीता शासन हमी.
- SEBI मान्यताप्राप्त Venture Capital Fund मध्ये २५% पर्यंत गुंतवणूक व Venture Capital Fund/Angel Fund चा प्राथमिकतेने स्टार्टअपकरिता उपयोग.
- मान्यताप्राप्त Incubators ना केंद्र शासना इतकाच राज्य शासनाकडून बीज भांडवलाकरिता निधी.
- केंद्र शासनाच्या National Rural Health Mission अंतर्गत राज्याकरिता उपलब्ध होणाऱ्या निधीचा नाविन्यता व स्टार्ट-अप करिता उपयोग.

❖ **आर्थिकेतर बाबींसंदर्भात सुट/प्रोत्साहन**

- Start-up आस्थापनांना विविध ७ कायद्यांतर्गत स्वप्रमाणित प्रमाणपत्रे सादर करण्यास मुभा.
- महिलांना तीन पाळयांमध्ये काम करण्याची परवानगी.

❖ **नाविन्यता आव्हान अनुदान** – नाविन्यतापूर्ण संकल्पनांकरिता विविध स्तरांवर स्पर्धांचे आयोजन व सर्वोत्कृष्ट प्रकल्पास आर्थिक स्वरुपातील बक्षिस व प्रशस्तीपत्र.

❖ **आर्थिक प्रोत्साहन –**

- केंद्र शासनाच्या मान्यताप्राप्त Incubators ना केंद्र शासनाइतकेच राज्य शासनाकडून अनुदान.
- मान्यताप्राप्त Incubators ना कार्यक्रम अंमलबजावणी, संनियंत्रणकरिता निधीच्या १०% रक्कम.
- Incubators साठी Corpus Fund च्या उभारणीकरिता CSR अंतर्गत उपलब्ध निधीचा विनियोग.
- मान्यताप्राप्त Incubators अथवा Start-up करिता जागा/इमारत विकत/भाडयाने घेणेसाठी नोंदणी शुल्काच्या प्रथम ट्रान्झेक्शनकरीता १००% व द्वितीय ट्रान्झेक्शनकरीता ५०% रक्कमेची प्रतिपूर्ती.
- भारतीय पेटंट नोंदणी करण्यासाठी २.०० लक्ष व विदेशातील पेटंट नोंदणी करण्यासाठी रु. १०.०० लक्ष मर्यादेपर्यंतच्या रक्कमेची प्रतिपूर्ती.

- **प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांचा सहभाग व योजनेचे संनियंत्रण**
    - ❖ मार्गदर्शक मंडळ म्हणून महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेतील सर्वसाधारण मंडळ (General Body) हे मार्गदर्शक मंडळ म्हणून काम करेल.
    - ❖ राज्य व जिल्हा स्तरावर Innovation Cell ची स्थापना.
    - ❖ औद्योगिक आस्थापनांचा सक्रिय सहभागाने संशोधन विंग व सेंटर ऑफ एक्सलन्स केंद्र, Incubators/ Accelerators स्थापन करण्यास प्रोत्साहन तसेच प्रस्थापित औद्योगिक आस्थापनांना राज्यातील विविध व्यावसायिक कौशल्य विकास व प्रशिक्षण संस्थांशी संलग्नित करणे.
- ग्रामीण व सामाजिक क्षेत्रातील Start-up/Incubators करिता संपर्क यंत्रणा विकसित करणे.
    - ❖ स्वतंत्र "इम्पॅक्ट फंड (Impact Fund)" ची उभारणी.
    - ❖ आंतरराष्ट्रीय स्तरावरील अग्रगण्य संस्थासमवेत भागिदारी.
    - ❖ जागतिक स्तरावरील इच्छुक विद्यार्थी, युवक, सामाजिक उद्योजक इत्यादींना Live Project वर काम करण्याची सुविधा.

***